**प्रेसनोट दि. २६/०४/२०१९**

**चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन**

**आंदोलन कर्ते जेष्ठ नागरिकास कायदेशिर बाजु समजावुन सांगुन त्याला आंदोलन करणे पासुन परावृत्त करुन पुणे स्टेशन येथे स्वतःचे गाडी मध्ये सोडुन पंढरपुर येथे जाणेसाठी स्वतःचे पैसेही दिले व माणुसकीचे दिले दर्शन.**

---

दि.२६/०४/२०१९ रोजी दुपारी १३/०० वा. चे सुमारास जेष्ठ नागरिक श्री ज्ञानेश्वर रामचंन्द्र घोडके,वय ७३ वर्ष मु.पो. अनवली ता. पंढरपुर जि. सोलापुर हे राज्य गुन्वेषण मुख्यालय पाषाण रोड पुणे येथे त्यांचे मुलीचे अनुषंगाने पंढरपुर तालुका पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजीस्टर नंबर ३३/२०१५ सी.आर.पी.सी. १७४ चा तपास सी.आय.डी. ने बंद केलेला तपास पुन्हा सुरु करावा याकरीता तेथिल रिसेप्शन कक्षातच पोर्च मध्ये आंदोलन सुरु केले असता सदर चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनचे गोपनिय शाखेचे पो.हवा. ५३९९ पिंगळे, पो.शि. ७७८१ चव्हाण यांनी तात्काळ जावुन नमुद जेष्ठ नागरिकांस कायदेशिर बाजु समजावुन सांगुन त्यांना आंदोलन करणे पासुन मतपरिवर्तन केले व त्यामुळे त्यांनी सदर आंदोलन मागे घेतले. व नमुद जेष्ठ नागरिक हे वयोवृध्द असलेने त्यांना पुणे स्टेशन येथे सुखरुप स्वतःचे गाडीने सोडवुन त्यांना पंढरपुर येथे जाणेसाठी स्वतःचे पैसेही दिले आहेत.